# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)
दूरध्वनी क्रमांक - ०२५३/२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.२३३३/२०२२/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.संजय कारभारी कुटे<br>रा.कुटे मळा, मु.पो.बेलतगव्हाण,<br>ता.जि.नाशिक ४२२ ४०१. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण.<br>ता.जि.नाशिक. | विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),<br>पंचायत समिती, नाशिक.<br>ता.जि.नाशिक. |

## विवेचन

अपिलार्थी यांनी उपरोक्त द्वितीय अपिलातील दि.१६/०२/२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये सन २०१६ ते आजपावेतो अशा कालावधीतील "सरपंच मोहनीश वसंत दोंदे यांच्या अध्यक्षतेखाली सरपंच झाल्यापासून तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष कोण आहे त्याची माहिती मिळावी. तसेच मोहनीश वसंत दोंदे सरपंच झाल्यापासून किती समित्या ग्रामसभेवर घेतलेल्या आहे त्या समित्यांची तयार केलेल्या व सरपंच झाल्यापासून किती ऑनलाईन ग्रामसभा घेतल्या त्याची माहिती मिळावी व किती ऑफलाईन ग्रामसभा घेतल्या त्या ग्रामसभेच्या प्रोसीडींगच्या नकला मिळाव्यात. तसेच २०१६ पासून ते आजपर्यंत तंटामुक्त अध्यक्ष कोण आहे त्याची लेखी स्वरुपात माहिती मिळावी व तंटामुक्त अध्यक्ष यांची पोलीस व्हेरीफीकेशन झालेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती मिळाव्या व त्या समितीवर कोण होते त्यांची यादी मिळावी वरीलप्रमाणे सत्य माहिती मिळावी." अशी माहिती अपिलार्थी यांनी मागितली आहे. सदर द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दि.२६/११/२०२५ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण ता.जि.नाशिक (श्री. राजेंद्र धुडकू महाले) यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण ता.जि.नाशिक (श्री.राजेंद्र धुडकू महाले) यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तसेच प्रथम अपिल निर्णयानुसार देखील अपिलार्थी यांना कोणतीही माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही. तसेच आयोगाच्या उपरोक्त नमूद आदेशाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण ता.जि.नाशिक (श्री.राजेंद्र धुडकू महाले) यांनी आयोगाकडे अद्यापपर्यंत कोणताही लेखी खुलासा सादर केल्याचे दिसून येत नाही. यावरुन त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कोणतेही गांभीर्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण ता.जि.नाशिक (श्री.राजेंद्र धुडकू महाले) यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक ता.जि.नाशिक यांनी त्यांच्या वेतनातून समान २

मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.२३३३/२०२२/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक ता.जि.नाशिक.

---

जावक क्र. 3233

दिनांक :- 06/04/2026